## "बॅ.बाळासाहब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र व ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागामार्फत वाचन प्रेरणा दिन साजरा"

बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र व ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 15 ऑक्टोबर 2020 रोजी भूतपूर्व माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त Online "Wachan Prerana Din (वाचन प्रेरणा दिन)" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनपटावर व त्यांनी केलेल्या विविध कामावर आधारित एका व्हिडीओचे प्रसारण करण्यात आले. या कार्यक्रमाचे स्वागत तथा प्रास्ताविक व प्रमुख वक्त्यांची तसेच अध्यक्षांची ओळख डॉ. नमिता खोत, संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र यांनी केले. प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. (प्रा.) यशवंत पाटणे, सातारा यांनी "वाचन : एक उर्जास्त्रोत" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात उर्जा/चैतन्य याचा योग्य वापर करणे आपल्या जीवनात महत्वाचे असते असे नमुद केले. मानवाच्या जीवनात पैसा,वेळ व उर्जा या तीनही गोष्टी महत्वाच्या असतात यापैकी उर्जा ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून ती सर्वात महत्वाची आहे. ही उर्जा मिळवण्यासाठी ग्रंथ व त्याचे वाचन यांचे महत्व त्यांनी अधोरेखित केले. याचबरोबर अध्यात्मिक ध्यानधारणा व शांतवाचन जीवनात सुख मिळणेसाठी महत्त्वाचे असतात असेही नमुद केले.तसेच त्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे कार्य व ग्रंथालयाचे महत्व सांगितले जीवन जगण्यामध्ये वाचन हे एक प्रभावी माध्यम असून जीवनाची सार्थकता यामुळे प्राप्त होते असे सांगितले.

या कार्यक्रमाला मा.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर प्रमुख अध्यक्ष म्हणून लाभले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात चांगले ग्रंथ, संदर्भ वाचनाबरोबरच अवांतर वाचन महत्वाचे आहे असे नमुद करून दुस—याला वाचनासाठी प्रवृत्त करावे व त्यामुळे त्यांना प्रेरणा प्राप्त होईल व त्यांची प्रगल्भता वाढते असे मत मांडले. शेवटी डॉ. डी. बी. सुतार, उपग्रंथपाल यांच्या आभारप्रदर्शनाने या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचा लाभ अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थी, संलग्नीत महाविद्यालयातील ग्रंथपाल,साहित्यिक, निवृत्त ग्रंथपाल व बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र व ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इ.यांनी घेतला..या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. युवराज जाधव, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांनी केले.